ISSN No. 2394-5990

इतिहासाचार्य वि. का. राजवाडे संशोधन मंडळ, धुळे
या संस्थेचे त्रैमासिक

# ॥ संशोधक ॥

पुरवणी अंक – मार्च २०२२ (त्रैमासिक)

● शके १९४३ ● वर्ष : ९० ● अंक : ६

**संपादक मंडळ**

● प्राचार्य डॉ.सर्जेराव भामरे ● प्रा.डॉ.मृदुला वर्मा ● प्रा.श्रीपाद नांदेडकर
**सहसंपादक** : डॉ.अर्जुन नेरकर व डॉ.संजय खैरनार; डॉ.राजेंद्र त्रिभुवन.

**❊ प्रकाशक ❊**

**श्री. संजय मुंदडा**

कार्याध्यक्ष, इ.वि.का. राजवाडे संशोधन मंडळ, धुळे ४२४००१.
दूरध्वनी (०२५६२) २३३८४८

**कार्यालयीन वेळ**

सकाळी ९.३० ते १.००, सायंकाळी ४.३० ते ८.०० (रविवार सुटी)

मूल्य ₹ १००/-

वार्षिक वर्गणी ₹ ५००/-; आजीव वर्गणी ₹ ५०००/- (१४ वर्षे)

**विशेष सूचना** : संशोधक त्रैमासिकाची वर्गणी चेक/ड्राफ्ट ने
'संशोधक त्रैमासिक राजवाडे मंडळ, धुळे' या नावाने पाठवावी.

**अक्षरजुळवणी** : अनिल साठये, बावधन, पुणे 21.

**मुखपृष्ठावरील चित्र :**

महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळाने या नियतकालिकेच्या प्रकाशनार्थ अनुदान दिले आहे. या नियतकालिकेतील लेखकांच्या विचारांशी मंडळ व शासन सहमत असेलच असे नाही.

# अनुक्रमणिका


१ ग्रामीण जीवन–व्यवहाराचे बदलते स्वरूप

- डॉ.गजानन भामरे, निमगाव, ता.मालेगाव -------

२ ग्रामीण साहित्यातील सामाजिकता

- प्रा.वर्षा अहिरे/ प्रा.सपना सोनवणे, मालेगाव -

३ दलित आत्मकथनातील समाज चित्रण

- प्रा.डी. ए. पाटील, शिरपूर, ता.धुळे -------

४ डॉ.अ.वा.वर्टी यांच्या कथेतील ग्रामजीवनातून फुलणारा विनो

- डॉ. अरूण पाटील, मालेगाव, जि.नाशिक ----------

५ दलित कथाकार अण्णाभाऊ साठे

- डॉ.अर्जुन नेरकर, मालेगाव, जि.नाशिक -------

६ दलित जाणीव चित्रण करणारी 'झूल' एक अभ्यास

- डॉ.सोमनाथ पावडे, सुरगणा, जि.नाशिक -------

७ दलित साहित्यातील सामाजिकता

- डॉ. वैशाली पाटील, चाळीसगाव ----------

८ दलित साहित्यातील वेगळेपण

- डॉ.सौ.मिनाक्षी पाटील, मालेगाव, जि.नाशिक --

९ आंबेडकरी चळवळीचे शिलेदार वामनराव गरूड

- डॉ. स्वप्नील गरुड, देवळा, जि.नाशिक -------

१० ग्रामीण साहित्याची चळवळ

- डॉ. किरण पिंगळे ----------------------

११ साहित्य अकादमी पुरस्कारप्राप्त मराठी ग्रामीण कादंबरीती स्त्री समाजजीवन

- डॉ.सुरेखा जाधव, निफाड, जि.नाशिक ------

# डॉ. अ.वा.वर्टी यांच्या कथेतील ग्रामजीवनातून फुलणारा विनोद

– डॉ. अरुण पाटील, मालेगाव, जि.नाशिक

डॉ.अ.वा.वर्टी हे मराठी साहित्यातील महत्त्वाचे विनोदी कथा लेखक म्हणून ओळखले जातात. कथालेखनाद्वारे विनोद निर्मिती करणारे लेखन त्यांनी केले. स्वातंत्र्योत्तर काळातील मराठी विनोदी कथा अनेक लेखकांनी समृद्ध केलेली असली तरी प्रामुख्याने तिच्याकडे गांभीर्याने लक्ष देऊन तिला आपल्या परीने प्रतिष्ठा प्राप्त करून देण्याचा प्रयत्न डॉ. वर्टी यांनी केलेला आहे. विनोद हा केवळ थट्टा-मस्करीचा किंवा टिंगल-टवाळीचा विषय नसून तो मानवी जीवनातील अंगभूत भागच असतो. त्याच्या मुळाशी कधी सहानुभूती दडलेली असते. शिवाय जीवन व्यवहारातील एक महत्त्वाचे सांस्कृतीक अंग म्हणूनही विनोद कार्यरत असतो, यादृष्टीने मराठी माणसात विनोद रुजविण्याचे महत्कार्य डॉक्टर अ.वा. वर्टी यांनी केले आहे. म्हणूनच स्वातंत्र्योत्तर काळातील मराठी कथाकारात तसेच विनोदी वाङ्‌मयात डॉ. अ.वा. वर्टी यांचे नाव अग्रक्रमाने घ्यावे लागते.

डॉ.अ.वा.वर्टी यांच्या कथा विश्वातून शहरी जीवनातील विनोदाबरोबरच ग्राम जीवनातील काही हास्यकारक प्रसंगही येताना दिसतात. डॉ. वर्टी यांचा मूळ पिंड नाशिकसारख्या शहरी जीवनातील. परंतु काही कामानिमित्त व डॉक्टरी व्यवसायामुळे त्यांचा खेड्याशी सतत संपर्क येत होता. त्याआधारे त्यांनी ग्रामजीवनातील काही वृत्ती प्रवृत्तींचा वेध घेण्याचा प्रयत्न केला आहे. खेडे गावातील अंधश्रद्धा, साधी – भाबडी माणसे, तसेच बेरकी – इरसाल नमुने गावागावातील -माणसामाणसातील संघर्ष यांचे सुंदर चित्रण डॉ.अ. वा. वर्टी काही कथातून करतात. यादृष्टीने त्यांच्या भुताटकी, खेड्याबल्ली माणसं, पाऊस! पाऊस! टिवली – बावली, इत्यादी सारख्या कथा अभ्यासण्यासारख्या आहेत.

'भुताटकी' या कथेतून कोकणातील खेड्यात जी अंधश्रद्धा, भुते-खेते पसरलेली आहेत. त्यांचे चित्रण येते. निवेदक आणि त्याचा मित्र बसंत हवा फेरासाठी

कारवार जवळच्या खेड्यात जातात. तेथे त्यांना भुताटकीचा अनुभव कसा येतो, ते या कथेतून रेखाटले आहे. वसंता कवी मनाचा, घाबरट, त्यात पुतशेणै या कोकणी माणसाने त्यांना भूताविषयी बरेच सांगितले. त्यामुळे त्याच्या शिक्षित मनाची चलबिचल होते. निवेदक त्याला भूते नसतात. म्हणून पटवण्याचा प्रयत्न करतो. खेड्यातील 'अडाणी' लोकांची ती समजूत असल्याचे सांगतो व भूते असली तरी ती -'राम-राम' म्हटल्यास वा जानव्याची ब्रह्मगाठ भूतांना दाखविल्यास ते पळून जातात. असे परोपरीने समजावतो. मात्र कच्च्या काळजाच्या 'वसंताला' पौर्णिमेच्या रात्री भुताटकीचा अनुभव येऊन तो बेशुद्ध होतो. रात्री ट्रंक उघडण्यासाठी गेलेला भयभीत वसंता जाणव्याला अडकवलेली किल्ली कुलपाला लावतो. मात्र ती कंप करत असताना कंपित हाताने नीट फिरत नाही व निघत नाही. त्याला भुताने जानवे पकडल्याचा भास होतो आणि 'भूत-भूत' करून बेशुद्ध पडतो. तेव्हा भुताच्या भीतीने नाही मी वापरत जाणवं, किल्ल्या ठेवायला उपयोगी पडतं ते चांगलं.[१] असे सांगणारा वसंता जाणव्यामुळेच भुताच्या कचाट्यात सापडतो. निवेदक मात्र धूर्त आणि समंजस आहे. भूताविषयी यत्किंचितही लवलेश त्याच्या मनात नाही. मात्र यानिमित्ताने खेडेगावात त्यातही कोकण सारख्या पारंपरिक खेड्यात-पुतशेणै सारखे इरसाल व बेरके इसम भूता-खेतांविषयी अशी अंधश्रद्धा कशी पेरत जातात, यावर या कथेतून सुंदर प्रकाश पडतो. लेखकाने कोकण, तेथील निसर्ग, समुद्र त्यात दबा धरून बसणारे भय याविषयी यथातथ्य चित्रण केले आहे.

'खेड्यावल्ली माणसं 'ही कथादेखील खेड्यातील इरसाल नमुने उभी करणारी! डॉक्टरांकडे काळू पाटील हा मडकीदामचा पुढारी एक आजारी मूल तपासण्यासाठी आणतो. 'वासरात लंगडी गाय शहाणी' तसा तो अडाण्या गावकऱ्यात शहाणा असतो. डॉक्टर तपासणी फी मागतात तेव्हा ते पोर रांडकू असल्याचे व ती विधवा अन्नाला मोताद असल्यामुळे आम्ही तपासणीसाठी आणल्याचे सांगतो. डॉक्टरांची गरिबीमुळे सहानुभूती मिळवून फी कमी देतो. त्यातही घासलेले खराब पैसे हातावर टेकवतो. तिकडे वकीलातीत मात्र पाच लाखांसाठी दावा सुरु असतो. अशी काळू पाटलांसारखी 'खेड्यावल्ली माणसं' या कथेतून डॉक्टर वर्टीनी उभी

केली आहेत. अडाणीपणाचा बुरखा/मुखवटा धारण करून आम्ही 'खेड्यावळी माणसं' आहोत असे सांगून ती शहरातील सुशिक्षितांनाही कशी फसवतात.याचे उपरोधाच्या अंगाने चित्रण येते. मात्र हा उपरोध लेखकाने अधिक ताणल्यामुळे कथेतील गंमत कमी होते. शिवाय खेड्यातील अधिकाधिक व्यक्ती अशा असतात, असे नव्हे तेव्हा अपवादाने नियम सिद्ध करण्याचाच हा प्रकार म्हणता येईल.

'टिवली - बावली' ही कथा दोन खेडेगावांमध्ये आपले देवस्थान जागृत करण्यावरून जो वाद उद्भवतो, त्याचा वेध घेते बावली गावचा सरपंच दुलाजी पाटील. या गावची म्हातारी पुंजाबाई हिचा मुलगा नाऱ्या याला पोलीस पकडून नेतात. तेव्हा तो सुटावा म्हणून पुंजाबाई बावलीच्या तातोबा देवाला नवस करते आणि नाऱ्या सुटला तर एक बोकड मारण्याचे पंचायतीत ठरते. गावचा म्हसोबा जागृत असल्याची पंचक्रोशीत चर्चा असते.म्हसोबाची यात्रा मोठी भरते, सरपंच - पंचायतीला फायदा होतो. त्यामुळे बावलीच्या नागरिकांच्या मनात त्याविषयी असूया निर्माण होते.तेव्हा ते आपले 'तातोबा देवस्थान' जागृत करण्यासाठी - प्रसिद्धीसाठी धडपडतात. तेव्हा पोलिसांनी धरून नेलेला नाऱ्या सुटला, तर तो तातोबाच्या नवस बोलल्यामुळे सुटला,असे पंचक्रोशीत पसरवून बाहुलीचा देव 'पावरबाज' असल्याबद्दल अफवा पसरविण्याचे ठरले. तिकडे टिवलीच्या सरपंचाला - गंगाराम पाटलाला नाऱ्या सुटावा म्हणून तातोबाला नवस बोलल्याचे व हे देवस्थान जागृत करण्यासाठी कारस्थान सुरू असल्याचे समजते. तेव्हा तो फौजदाराशी संधान साधून नाऱ्या सुटू नये म्हणून खटपट करतो. दरम्यान पुंजाबाई केवळ तातोबाला नवस बोलूनच थांबत नाही; तर हाकेच्या अंतरावर असलेल्या म्हसोबाला देखील नवस बोलते. 'टिवली बावलीच्या चांडाळ चौकळड्यात भांडणे असली म्हणून देवांमध्ये थोडीच भांडणे असणार? म्हसोबालाही नवस केला की, तोनि तातोबा, दोघे मिळून नाऱ्याला सोडवायची खटपट करतील. तातोबामुळे असो की, म्हसोबामुळे असो, आपला नाऱ्या सुटला म्हणजे झाले.'[२] अशी म्हाताऱ्या पुंजाबाईची श्रद्धा असते.जागृत देवस्थान करण्यासाठी नाऱ्यासारख्या सामान्य माणसाचा कसा बळी जातो आणि सामान्य माणसांच्या श्रद्धेसोबत कसे खेळले जाते.याचे प्रत्यंतर या कथेतून येते. 'टिवली - बावली' ही कथा दोन गावातील,

ISSN No. 2394-5990

दोन देवातील संघर्ष चित्रित करून थांबत नाही; तर त्याच्या पलीकडे जाऊन दोन धर्मातील, दोन समाज-गटातील देवांविषयीच्या संघर्षाचेही चित्रण करते. केवळ हलका-फुलका म्हणून हाताळलेला विषय खोलात गेल्यावर गांभीर्य धारण करतो. बाबरी मशीद आणि राम जन्मभूमी या दोन देवस्थानाविषयी निवडणुकीच्या काळात जो वाद पेटवला जातो. त्याचेही सूचन आपणास यातून होते.

'पाऊस पाऊस!! या कथेतील पावसासाठी उपोषण करणारा नाना पाटील व त्यांची बायको यशोदा यांचे चित्रण येते. भाऊराव पाटील नाना पाटील यांना हरवून सरपंच होतो. तेव्हा गावकऱ्यात आपला भाव वधारावा, पुढे आपण सरपंच व्हावे म्हणून ऐन पावसाळ्याच्या तोंडी नाना पाटील उपोषणास बसतो. तीन-चार दिवसानंतर पाऊस देखील यावयाला लागतो. परंतु उपोषणाने सुरू झालेला पाऊस थांबण्याचे नावच घेईना. नद्या-नाले, धरणे तळी गच्च भरतात. त्यामुळे अगोदर नाना पाटलांचा जयजयकार करणारे गाव नंतर काठ्या घेऊन पाठीशी लागते. तेव्हा नाना पाटलाला सरपंचकीची आसच नव्हे; तर मडकीदाम गावाची वेस देखील सोडावी लागते. पाऊस का थांबत नाही, याबद्दलचे नाना पाटील व त्याची बायको यशोदा यांच्यात झालेले संभाषण मोठे मजेशीर आहे -

''नशीबच फुटकं तुमचं!'' यशोदा रागावून म्हणाली, ''चांगलं सरपंच झाला असता तर हा घोटाळा करून ठ्येवला?''

''घोटाळा करून ठेवला? म्यां?'' नाना पाटलाने आश्चर्याने विचारले.

''न्हाईतर काय? पाऊस पाडायचा तो इतका न्हवता पाडायचा.''

''अगं, पण म्यां थोडाच पाऊस पाडला?''

''तुम्हीच पाडला उपोषाण करून. पन उपोषाण करताना तुम्ही भाकर खाल्ली चोरून.''

''अगदी मारुतीसमोर पाप केलं. त्याची शिक्षा देतोय देव आता.'' यशोदा रागावून म्हणाली.

''अगं पण भाकर तर तूच देत होतीस.''

''मी ब्येस देत व्हते, पण तुम्ही खावीच कशाला?''

''ते राहू दे. आता काय करायचं सांग.'' नाना पाटलाने काळजीच्या स्वरात

विचारले.

"आता काय विचारता मला! काही बी अक्कल न्हाई तुम्हासनी नि निघाले सरपंच व्हायला!" यशोदा चिडून म्हणाली.

अशाप्रकारे गाव पातळीवर निवडणुकीसाठी सहानुभूती मिळविण्यासाठी माणसे कुठल्या थराला पोचतील वा कुठली कल्पना-युक्ती अवलंबतील हे सांगणे कठीण. पण तीच कल्पना जेव्हा अंगलट येते. किंवा जवळचे देखील 'अंग' काढून घेतात, याचे सुंदर चित्रण या कथेतून येते. नाना पाटील व भाऊराव पाटील यांचा अंतर्गत संघर्ष असला तरी वरून ते कसे मिळते होतात, आपण गावकऱ्यात लोकप्रिय व्हावे म्हणून कशी विविध कामे करतात, त्याचेही चित्रण येते. मात्र 'गाईड' चित्रपटाचा खेड्यातील माणसांच्या तोंडी आलेला संदर्भ खटकतो व कथेतील पात्रांच्या तोंडची भाषा देखील 'ग्रामीणत्व' अस्सलतेने प्रकट करत नाही.

एकूणच ग्रामजीवनातून डॉ.वर्टी यांनी विनोद फुलविण्याचा प्रयत्न केला आहे. मात्र वर्टी हे मुळात मध्यमवर्गीय शहरी जीवनातील असल्यामुळे या मर्यादा त्यांना पडतात. व्हिजिटला जाण्यापुरता त्यांचा खेड्याशी जसा संबंध येत होता, तसाच खेड्यातील ग्रामजीवनातील वास्तवाचा त्यांचा संबंध बाह्यात्कारी स्वरूपाचा, वरवरचा आहे.ग्राममनातील 'विनोद' पकडण्याऐवजी ते केवळ प्रसंगनिष्ठ घटनांतून वा गाव पातळीवरील निवडणूक-सत्तासंघर्ष यातून विनोदनिर्मिती करण्याचा प्रयत्न करतात.

**संदर्भ ग्रंथ :**

१) डॉ. वर्टी, भुताटकी, मुमताज, पृष्ठ - ८३
२) डॉ.अ.वा. वर्टी, टिवली - बावली, पाऊस! पाऊस!, पृष्ठ -११६
३) डॉ. अ.वा.वर्टी, विनोद : एक व्याख्यान
४) राम कोलार, सर्वोत्कृष्ट मराठी विनोदी कथा, खंड १, संपा.

* * *